मटा अँकर **११ कोटी रुपयांची तरतूद; पूर्णपणे स्वतंत्र संस्थेत रूपांतर होणार, सहकारतज्ज्ञांकडून स्वागत**

# 'वैकुंठ मेहता'मध्ये पहिले सहकार विद्यापीठ

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



### प्रशिक्षणासह संशोधनाला चालना मिळणार

- 'व्हॅम्निकॉम' ही राष्ट्रीय पातळीवरची सहकार प्रशिक्षण संस्था आहे.
- अर्थसंकल्पात संस्थेसाठी प्रथमच थेट तरतूद
- सहकार प्रशिक्षणाला चालना मिळणार
- प्रशिक्षणासह संशोधनासाठी निधी उपलब्ध होणार

सहकार व्यवस्थापनाचे धडे देणाऱ्या पुण्यातील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेचे (व्हॅम्निकॉम) रूपांतर पूर्णपणे स्वतंत्र संस्थेत करण्यासाठी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात अकरा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 'व्हॅम्निकॉम'चे रूपांतर देशातील पहिल्या सहकार विद्यापीठात करण्याच्या दिशेने पडलेले हे पहिले पाऊल मानले जात आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात 'व्हॅम्निकॉम'साठी अकरा कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. 'व्हॅम्निकॉम' राष्ट्रीय पातळीवरची सहकार प्रशिक्षण संस्था असून, राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण परिषदेला (एनसीसीटी) देण्यात येणाऱ्या अनुदानातून या संस्थेला निधी दिला जात होता. आता 'व्हॅम्निकॉम'चे पूर्णपणे स्वतंत्र संस्थेत रूपांतर करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे प्रथमच अर्थसंकल्पात संस्थेसाठी थेट तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

'व्हॅम्निकॉम'च्या संचालिका हेमा यादव म्हणाल्या, 'राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण परिषदेकडून 'व्हॅम्निकॉम'सह देशभरातील सहकार प्रशिक्षण संस्थांना अनुदान मिळते. यंदा प्रथमच अर्थसंकल्पात संस्थेसाठी थेट निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून संस्थेच्या प्रशासकीय खर्च भागवितानाच सहकाराच्या प्रशिक्षण व संशोधनासाठी निधी उपलब्ध करता येईल.'

'व्हॅम्निकॉम'चे रूपांतर स्वतंत्र सहकार विद्यापीठात करण्याच्या दिशेने पडलेले हे पहिले व योग्य पाऊल आहे,' असे म्हणून महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी या तरतुदीचे स्वागत केले. 'केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी देशात सहकार विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर 'व्हॅम्निकॉम'चे रूपांतर पहिल्या सहकार विद्यापीठामध्ये करावे, असे निवेदन मी दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही या संदर्भात केंद्रीय सहकारमंत्र्यांना पत्र दिले होते.

'व्हॅम्निकॉम' संस्थेच्या वार्षिक दीक्षान्त सोहळ्यालाही शहा उपस्थित होते. आता अर्थसंकल्पात 'व्हॅम्निकॉम'साठी थेट तरतूद करण्यात आली असून, स्वतंत्र संस्थेचा दर्जा देण्यात येत आहे. त्यामुळे या संस्थेला सहकार शिक्षणाचा प्रसार, प्रचार करण्यास मदत होईल.'

महाराष्ट्र टाइम्स 3-2-2022 Pg ①